**भूमिगत स्थानके...** लॉकडाऊनमुळे कामास विलंब; खर्चातही वाढ

# मुंबई सेंट्रलपर्यंतचे भुयारीकरण पूर्ण

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई , ता. १ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३च्या भुयारीकरणाच्या कामाला गती आली असून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते मुंबई सेंट्रलपर्यंतचे काम आज पूर्ण झाले. हे काम फेब्रुवारीपर्यंतच पूर्ण करण्यात येणार होते; मात्र लॉकडाऊनमुळे कामाला विलंब झाला. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गिकेचे सात टप्प्यांमध्ये काम सुरू आहे. संपूर्ण मार्गिकेसाठी ५५ किलोमीटर लांबीचे भुयारीकरण करण्यात येत आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसी) या मार्गिकेचे काम



पूर्ण करण्यासाठी पाच वर्षांचे लक्ष्य ठेवले होते; मात्र दोन वर्षांमध्येच याचे तीन चतुर्थांश काम पूर्ण करण्यात आले आहे.

२०२२ पूर्वीच भुयारीकरणाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. ऑक्टोबर २०१७ मध्ये याचे काम सुरू करण्यात आले होते.

> कोरोनाचे आव्हान असतानाही सीएसएमटी ते मुंबई सेंट्रलपर्यंतचे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. राज्य सरकारने दिलेल्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करत ही कामे केली जात आहे. मोडकळीस आलेल्या इमारती आणि समुद्राच्या किनाऱ्यालगत या भुयारीकरणाचे काम आव्हानात्मक ठरले.
>
> **- रणजित सिंह देओल,** व्यवस्थापकीय संचालक, एमएमआरसी

मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारीकरणाच्या कामापैकी ४० किमी लांबीचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. टनेल बोअरिंग मशिन्समार्फत (टीबीएम) मार्गिकेच्या भुयारीकरणाच्या कामाला आता गती आली आहे. आतापर्यंत मार्गिकेच्या भुयारीकरणाचे ७२ टक्क्यांपर्यंत काम पूर्ण झाले आहे. कोरोनामुळे काही काळ या कामांना एमएमआरसीने स्थगिती दिली होती. त्यामुळे प्रकल्प पूर्ण होण्याच्या कालावधीत आणि प्रकल्प खर्चात वाढ झाली आहे.

या स्थानकांचा समावेश

मेट्रो -३ च्या ४ किलोमीटर लांबीच्या भुयारीमार्गात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मुंबई सेंट्रल , काळबादेवी, गिरगाव आणि ग्रॅण्ट रोड या पाच भूमिगत स्थानकांच्या समावेश आहे.